**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या गुजरात आणि महाराष्ट्राच्या दौऱ्यावर
- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम विभागीय राज्य परिषदेची बैठक गोव्यात सुरु
- दिल्लीच्या सत्य निकेतन इमारत दुर्घटना प्रकरणी मृतांची संख्या ७ बचावकार्य अद्याप सुरूच
- महाराष्ट्रात एमपीएससी परीक्षा घोटाळ्यांच्या निषेधात उमेदवारांच्या मोर्चात विरोधी पक्ष नेत्यांचा सहभाग

**आणि**

- अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत गतविजेते अरिना सबालेंका आणि कार्लोस अल्काराज उपान्त्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या गुजरात आणि महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. वडोदरा इथे ३५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध विकासकामांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. तसंच, ते २० हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चातून विकसित केलेल्या वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोरच्या तीन महत्त्वाच्या टप्प्यांचं राष्ट्रार्पण करतील. त्याशिवाय ते चार मालवाहू रेल्वे सेवांना तसंच, वडोदरा आणि तांडा रोड दरम्यान नवीन रेल्वे सेवेलाही हिरवा झेंडा दाखवतील. उदेपूर-धार प्रकल्पाचा भाग म्हणून विकसित केलेल्या जोबाट-तांडा दरम्यानच्या नवीन रेल्वे मार्गाचं राष्ट्रार्पणही प्रधानमंत्री करणार आहेत. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ९ हजार ७०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या तीन रेल्वे प्रकल्पांची तसंच, सुमारे १ हजार ७८० कोटी रुपये खर्चाच्या तीन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी होणार आहे. गुजरात सरकारच्या सुमारे २ हजार ६०० कोटी रुपये किमतीच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर प्रधानमंत्री महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६चं उद्घाटन करणार आहेत.

<><><><><>

पश्चिम विभागीय परिषदेची 28वी बैठक आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली गोव्यात पणजी इथं सुरु आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत,तसंच दमण दीव आणि दादरा नगरहवेलीचे प्रशासक प्रफुल्ल पटेल यांच्यासह केंद्र आणि राज्यसरकारांमधले वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित आहेत. प्रादेशिक हिताच्या अनेक मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा होत आहे. केंद्रीय गृहमंत्री सध्या तीन दिवसांच्या गोवा दौऱ्यावर आहेत.

<><><><><>

महिला आणि बालविकास मंत्रालयाद्वारे वाराणसी इथे येत्या ९ तारखेला नवव्या राष्ट्रीय पोषण माह २०२६ या विशेष मोहिमेचा केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांच्या हस्ते प्रारंभ होणार आहे. यंदाची या मोहिमेची संकल्पना आमची अंगणवाडी आमची जबाबदारी ही आहे. अंगणवाडी केंद्राची सामूहिक जबाबदारी उचलण्यासाठी नागरिकांना आवाहन करणं हा या संकल्पनेचा उद्देश आहे. याशिवाय यंदा पोषण माहची अंमलबजावणी अन्य पाच परस्पर पूरक संकल्पनांवर केली जाईल. आहारातली विविधता आणि मुबलक प्रथिने, अंगणवाडी केंद्रांवर ताजं, गरम जेवण, सामुदायिक उत्तरदायित्व, बालविकासासाठी पोषण आणि शिक्षण या पाच घटकांचा त्यात समावेश आहे.

<><><><><>

देशातले वृद्धाश्रम आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध असणाऱ्या सुविधा यांबाबतचा अद्ययावत स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश आज सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना दिले. सुमारे दहा वर्षांपूर्वी दाखल झालेल्या एका प्रलंबित जनहित याचिकेवर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहना यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. वृद्धांच्या कल्याणासाठी तसंच संरक्षणासाठी उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी यांनी सर्व राज्यांच्या महाधिवक्त्यांना पत्र पाठवून वृद्धाश्रम उभारणी आणि तिथल्या सोयी सुविधांविषयीचा अहवाल सादर करायला सांगण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने यावेळी दिले.

<><><><><>

नवी दिल्लीत  सत्यनिकेतन भागात पाच मजल्यांची इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेची न्याय दंडाधिकारी पातळीवर चौकशी केली जाईल, तसंच  इमारत मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दिले आहेत. दुर्घटनेनंतर इमारत मालक फरार झाला असून पोलिसांची दहा पथकं त्याचा शोध घेत आहेत. आज सकाळी मुख्यमंत्री गुप्ता यांनी दुर्घटनाग्रस्त भागाची पहाणी करत बचाव कार्याचा आढावा घेतला. काल दुपारी इमारत कोसळून झालेल्या या दुर्घटनेतील मृतांची संख्या सात झाली आहे.

**होल्ड बाईट रेखा गुप्ता**

**(दुर्घटनाग्रस्त इमारत जुनी होती, तसंच इमारतीच्या तळघरात पाणी साचल्यानं तिथले खांब कमकुवत झाल्यानं ही इमारत कोसळल्याचं मुख्यमंत्री गुप्ता यांनी यावेळी सांगितलं. खबरदारीचा उपाय म्हणून आजूबाजूच्या इमारती रिकाम्या केल्या आहेत. दुर्घनाग्रस्त इमारतीच्या अगदी बाजूची इमारतही रिकामी केली असून लवकरच ती पाडली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.**)

घटनास्थळी ढिगारा उपसण्याचे आणि बचाव कार्य करण्याचे काम  आपत्ती प्रतिसाद दल, अग्निशमन दलाचे पथक करत आहे. इमारतीच्या ढिगाऱ्याखाली काहीजण अडकल्याची शक्यता वर्तवली जात आहे. दुर्घटनाग्रस्त इमारतीत महाविद्यालयीन विद्यार्थी भाडेतत्वावर रहात होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्री तसंच पोलिस आयुक्त, एनडीआरएफच्या महासंचालकांशी चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला. जखमींना सर्व वैद्यकीय मदत पुरवण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान, सत्यनिकेतन परिसरातील इमारत दुर्घटनेनंतर  दिल्ली उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल झाली आहे. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस करिया यांच्या पीठासमोर आज याची सुनावणी होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधे पेपरफुटी आणि इतर गैरप्रकारांची जबाबदारी स्वीकारुन  आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी

एमपीएससी उमेदवारांनी केली आहे. या आणि इतर १० मागण्यांच्या समर्थनार्थ एमपीएससीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आज राज्यात अनेक ठिकाणी मोर्चा काढला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार, कांग्रेसचे आमदार विश्वजीत कदम पुण्यातल्या मोर्चात सहभागी झाले होते. राज्यशासनानं आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याकरता तातडीनं जबाबदार प्रतिनिधी पाठवावा अशी मागणी सुळे यांनी केली.

यांप्रकरणी मुंबई पोलीस तपास करत असून आतापर्यंत ७ जणांना अटक झाली आहे. लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसंदर्भात सुधारणा सुचवण्यासाठी राज्यशासनानं एक उच्चस्तरीय समितीही स्थापन केली आहे.

<><><><><>

नेपाळ-तिबेटमध्ये आलेल्या महापुरात मरण पावलेल्यांची संख्या १ हजार ३५५ इतकी झाली असल्याची माहिती नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणानं दिली. नेपाळमधे चितवन इथं ३६३ जणांचा मृत्यू झाले . तर पूर्व नवल परासीमध्ये २२, पश्चिम नवल परासीमध्ये २२१ आणि रसुवा जिल्ह्यात १६९ जणांचा मृत्यू झाला.

भोटेकोशी आणि त्रिशूली नदी परिसरातील जलविद्युत प्रकल्पांमध्ये अडकलेल्या नागरिकांसाठी शोध आणि बचावकार्य अजूनही सुरू आहे. ११ जलविद्युत प्रकल्पांमधल्या ९१९ कर्मचाऱ्यांशी अद्याप संपर्क होऊ शकला नसल्याची माहिती वीज निर्मिती कंपनीनं दिली आहे. दरम्यान, २६ ऑगस्टला आलेल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांच्या स्मरणार्थ आज नेपाळमध्ये राष्ट्रीय दुखवटा पाळण्यात येत आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरात वाढ होत आहे. या तेजीमुळे आज ब्रेंट क्रूड तेलाचा दर प्रतिबॅरल ९७ डॉलर्सच्या वर गेला आहे. तर वेस्ट टेक्सास इंटरमिजिएट क्रूड तेलाचा व्यवहार प्रतिबॅरल ९२ डॉलर्सच्या वर सुरू आहे.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत गतविजेते अरिना सबालेंका आणि कार्लोस अल्काराज यांनी उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. अरिना सबालेंका ने महिला एकेरीत काल अमेरिकेच्या टेलर टाऊनसेंडचा ६-४, ६-३ असा पराभव केला. उपान्त्यपूर्व फेरीत उद्या तिचा सामना झेक टेनिसपटू लिंडा नोस्कोव्हा हिच्याबरोबर होईल.

पुरुषांच्या एकेरी गटात, कारलोस अल्काराजने अमेरिकेच्या टॉमी पॉलचा ६-४,६-३, ६-४ असा पराभव केला. उद्या उपान्त्यपूर्व फेरीत त्याची गाठ अमेरिकेच्या बेन शेल्टनबरोबर पडेल.

**<><><><><>**

नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात आज ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेच्या विजेत्या ईस्ट बंगाल फुटबॉल क्लबला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती चषक प्रदान केला. या वेळी ड्युरंड फुटबॉल टूर्नामेंट सोसायटीचे अध्यक्ष आणि संरक्षण दल प्रमुख जनरल एन. एस. राजा सुब्रमणी, लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ, हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग आणि नौदल प्रमुख ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन तसंच ईस्ट बंगाल फुटबॉल क्लबचे पदाधिकारी आणि खेळाडू उपस्थित होते.

**//<><><><><>//**